REGISTERED No. B 3434

# अर्थ

‘ अर्थ एव प्रधानः ’ इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख १९ फेब्रुवारी, १९४१ अंक ८

**जाहीरातींचे दर.**

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
‘ दुर्गाधिवास ’ पुणें ४.

**वर्गणीचे दर.**

वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

**‘ पायोनियर डाइंग हाऊस ’**

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

**९ वा आठवडा**

**नवयुग चित्र**

**लग्न पहावं करून**

दिग्दर्शक : विनायक
भूमिका : दामुअण्णा मालवणकर

**मिनर्व्हा – पुणें**

**देशी औषधें तयार करणारा**
**महाराष्ट्रांतील प्रमुख कारखाना**

पंडु, (ॲनिमिया) व सर्व प्रकारच्या आजारानंतर येणाऱ्या

**अशक्ततेवर**

# रक्तवर्धक

**वापरा.**

**सर्वत्र मिळतें.**

—: केंद्रें :—

पुणें, मुंबई, उमरावती, नागपूर, सांगली, कोल्हापूर, हुबळी.

**आयुर्वेद रसशाळा**
**पुणें, लि.** पुणें ४.

*For Collegians—*

Wooden & Iron Furniture

FOR SALE & HIRE

*Your Popular Old Shop*

**SHEVAK BROS.**

*Work-shop Address :*
153. KASABA POONA 2

*Branch No. 1*
SHEVAK QUARTERS
*Near Fergusson College. POONA 4*

# विविध माहिती

### बँकास सुट्टी

सोमवार ता. २४ फेब्रुवारी रोजीं महाशिवरात्रीनिमित्त बँका बंद राहतील.

### चीन-ब्रह्मदेश रस्ता

आपल्या बाँबच्या वर्षावामुळें चीन-ब्रह्मदेश रस्ता वहातुकीस निरुपयोगी झाला आहे, हें जपानी सरकारचें म्हणणें चूक असून त्या रस्त्यावरून पूर्ववत् वहातूक चालू आहे असें मॉस्को येथील रेडिओवरून जाहीर करण्यांत आलें आहे.

### चेक्सची देवघेव

मुंबई येथील बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें ७ फेब्रुवारीअखेर संपलेल्या आठवड्यांत १८¾ कोटि रुपये किंमतीच्या १,२१,३५८ चेक्सची देवघेव झाली.

### सूचना पाठविण्याची मुदत वाढविली

मुंबई सरकारनें शेतकरी कर्जनिवारणाच्या बिलास अनुसरून नियम तयार केले आहेत, त्यासंबंधीं सूचना अगर तक्रारी पाठविण्याची मुदत ३१ मार्च अखेर होती, ती आतां सरकारनें १५ मार्चपर्यंत वाढविली आहे.

### स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार

स्थानिक स्वराज्य संस्थांचा करवसुलीचा कारभार अत्यंत ढिला आहे. आळंदी व खेड येथील म्युनिसिपॅलिट्यांची वसुली बिलकूल थकलेली नाहीं. तथापि सिंदखेडें, होनावर, इंद्रापूर, यावल, फैजपूर इत्यादि ठिकाणीं थकलेली बाकी एकूण येण्याच्या ६०% पेक्षा अधिक आहे. मालेगांव व धारवाड येथील म्युनिसिपॅलिट्यांच्या एकूण येण्याचे मानानें ५०% येणें कर थकलेला आहे. १९३९-४० च्या लोकल ऑडिट खात्याच्या अहवालांत वरील माहिती आढळते.

### रेल्वे रुळांचा युद्धकार्यासाठीं उपयोग?

सहा लहान रेल्वे रस्ते तूर्त उखडून टाकण्यांत आले आहेत, कारण ते किफायतशीर होत नाहींत, असें वहातुक मंत्र्यांनीं असेंब्लींत सांगितलें. काढून टाकलेले रूळ हिंदुस्थानाबाहेर युद्धकार्यासाठीं उपयोगांत आणले गेले, तर त्याच्या किंमतीची भरपाई ब्रिटिश सरकार करील, असेंहि ते म्हणाले.

### शर्यतींचें युद्धफंडासाठीं उत्पन्न

ता. ८ रोजीं मुंबई येथील शर्यतीच्या मैदानावर युद्धफंडासाठीं शर्यतींचा कार्यक्रम झाला, त्यावेळीं १ लक्ष १५ हजार रुपये फंडास मिळाले.

### ट्रेझरी बिलांवर द. सा. द. शे. ११ आणे व्याज

गेल्या आठवड्यांत रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थान सरकारचीं १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. ११ आणे पडला.

### कर्जरोख्यांचें रूपांतर

"हिंदुस्थानच्या ब्रिटिश पौंडांतील कर्जरोख्यांचें रुपयांतील रोख्यांत रूपांतर केल्यामुळें हिंदुस्थान सरकारचे व्याजाचे १½ ते २ कोटि रुपये वांचतील. कारण रुपयांतील कर्जरोख्यांवरील व्याजांचा दर अल्प राहील. ह्या रूपांतरामुळें, नवीन कर्ज नाहीं काढलें, तरी सरकारचें भागेल." असें ना. शांतिलाल आस्कुरण ह्यांचें मत आहे.

### ८० हजार ट्रॅक्टर्स

ग्रेट ब्रिटनमध्यें शेतीचें उत्पादन वाढविण्याची शिकस्त चालू आहे. ८० हजार ट्रॅक्टर्स त्यांत गुंतले आहेत.

### बजेट जवळ आलें

मध्यवर्ति असेंब्लीच्या बजेट अधिवेशनास ता. १२ रोजीं प्रारंभ झाला.

### डिफेन्स सर्टिफिकिटें गहाण ठेवतां येतील

५ वर्षे मुदतीचीं पोस्ट ऑफिस कॅश सर्टिफिकिटें गहाण ठेवतां येतात, त्याप्रमाणेंच नवीं डिफेन्स सेव्हिंग्ज सर्टिफिकिटेंहि ठेवतां येतील, असें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे.

### नागपूर येथें रेडिओगृह

हिंदुस्थानांत नवीन रेडिओगृहें स्थापन करण्याचा प्रश्न सरकार विचारांत घेईल, त्यावेळीं नागपूरचें नांव ध्यानांत ठेवलें जाईल, असें सर अँन्ड्र्यू क्लो ह्यांनीं असेंब्लींत सांगितलें.

### हिन्दी लष्करी अधिकारी

चालू युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत डेहराडून येथील २१६ उमेदवारांस लष्करांत कमिशनें देण्यांत आलीं आहेत. १२८ उमेदवारांचें शिक्षण तेथें चालू आहे. युद्धास प्रारंभ झाल्यापासून आजतागायत कमिशन मिळालेले, शिक्षण घेत असलेले व शिक्षणासाठीं निवडलेले असे १७५२ हिंदी तरुण आहेत.

### युद्धकैदी

हिंदुस्थानांत जर्मन युद्धकैदी एकहि नाहीं, परंतु सहस्रावधि इटालिअन युद्धकैदी येथें आहेत, अशी माहिती डिफेन्स सेक्रेटरीनें असेंब्लींत सांगितली.

### ग्रेटब्रिटनमधील हिंदी विद्यार्थी

हिंदुस्थानाकडे परत येऊं इच्छिणारे कांहीं हिंदी विद्यार्थी ग्रेटब्रिटनमध्यें आहेत, परंतु त्यांचेसाठीं वहातुकीची सोय अद्याप झालेली नाहीं. दोन आगबोटींतून बरींच हिंदी मुलें आणण्यांत आलीं आहेत.

### तांदळाच्या किंमतींत निष्कारण चलबिचल होण्याचें प्रयोजन नाहीं

मध्य आशियांतील युद्धाच्या रागरंगावरून असें दिसतें, कीं ब्रह्मदेश व हिंदुस्थान ह्यांचेमधील वहातुकीसाठीं आगबोटींचा पुरवठा तात्पुरता थोडा कमी पडेल. ब्रह्मदेशांतून हिंदुस्थानांत तांदळाची आयात होण्याचीहि हीच वेळ आहे. हिंदुस्थानांतील कांहीं ठिकाणीं तांदळाचें उत्पादन नेहमींइतकें आलेलें नाहीं. तांदळाच्या किंमतीमध्यें निष्कारण चलबिचल होऊं नये, ह्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारनें ही परिस्थिति स्पष्ट केली आहे व आगबोटींचा तुटवडा तात्पुरताच असून लवकरच वहातुकीची सर्व व्यवस्था होईल, असें जाहीर केलें आहे.

### हिंदुस्थान सरकारचा उत्पन्न खर्च

डिसेंबर, १९४० अखेरच्या नऊ महिन्यांत हिंदुस्थान सरकारास गेल्या वर्षीच्या तत्सम मुदतीमधील उत्पन्नापेक्षा ८ कोटि रुपये उत्पन्न कमी झालें. खर्च मात्र ९ कोटि रुपयांनीं अधिक झाला. उत्पन्नांतील घटीचें कारण मुख्यत: कस्टम्सच्या उत्पन्नांत ७ कोटींची आलेली तूट, हें होय. खर्चांत वाढ झाली, तीहि मुख्यत: लष्करी खर्चांतच झाली. उत्पन्न व खर्च ह्यांत ३५ कोटींचा फरक पडला आहे. रेल्वेज, पोस्ट व तार खातें व इतर बाबी ह्यांचेकडून मिळणारें उत्पन्न वरील हिशेबांत दाखल नाहीं.

### चीनकडे कपाशीची निर्गत

१९३९-४० मध्यें हिंदुस्थानानें चीनकडे ६ कोटि, ६८ लक्ष रुपये किंमतीची १ लक्ष २२ हजार टन कपास पाठविली. त्यापूर्वीच्या वर्षी फक्त ३४ हजार टन कपाशीची निर्गत झाली होती.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ८६ | ५ लिमिटेड कंपन्यांच्या नांवाची पाटी ... | ९० |
| २ हिंदी साखरेचें मध्यवर्ती नियंत्रण हवें काय? ... | ८७ | ६ विचारप्रवर्तक सहकारी बातम्या ... | ९१ |
| ३ बँक ऑफ महाराष्ट्र ... | ८८ | ७ हातमागाच्या धंद्याची ... पाहणी ... | ९२ |
| ४ स्फुट-विचार ... | ८९ | ८ लिमिटेड कंपन्यांस ओव्हरड्राफ्ट देण्याची पद्धत | ९२ |
| हिटलरचे नवे डावपेच— आणि त्यांचा प्रतिकार जपान काय करणार? | | ९ हिंदुस्थान-ब्रह्मदेश व्यापार | ९३ |
| | | ११ निवडक बाजारभाव ... | ९५ |

# अर्थ

बुधवार, ता. १९ फेब्रुवारी, १९४१

## हिंदी साखरेचें मध्यवर्ती नियंत्रण हवें काय?

संयुक्त प्रांत आणि बिहार येथील सरकारांनीं स्थानिक साखरेचे कारखाने व उंसाची लागवड ह्यांचें नियंत्रण करण्याचें धोरण अंगिकारल्यामुळें तिकडील कारखान्यांच्या हितसंबंधांमध्यें खळबळ उडाली आहे. हिंदुस्थानच्या इतर भागांत उंसाचें पीक व साखरेचें उत्पादन ह्यांचा विस्तार झाला आहे व होत आहे. ह्याचें कारण गेल्या दोन वर्षांत साखरेस आलेला चांगला भाव आणि इकडील नियंत्रणाचा अभाव हें आहे असें त्यांस वाटत आहे. दोन प्रांतांच्या सरकारांनीं स्थानिक साखरेच्या व उंसाच्या उत्पादनावर नियंत्रण घालावें आणि दुसरीकडे ह्या बाबतींत लोकांस पूर्ण स्वातंत्र्य असावें ह्याचें त्यांस वैषम्य वाटत असून हिंदुस्थान सरकारनें मध्यवर्ती राष्ट्रीय राजकीय सत्ता ह्या नात्यानें त्या प्रकरणीं हस्तक्षेप करावा आणि हिंदी साखरेच्या धंद्यांत एकसूत्रीपणा उत्पन्न करावा अशा सूचना पुढें येत आहेत. सबंध धंद्याच्या दृष्टीनें, कारखान्यांची वाढ होऊन साखरेच्या उत्पादनांत वर्षानुवर्ष भर पडत जावी आणि साखरेचे भाव खाली जाऊन सर्वांचेंच नुकसान व्हावें हें अनिष्ट आहे. हा युक्तिवाद त्या सूचनांच्या मुळाशी आहे. दक्षिणेकडील साखरेचे कारखानदार व प्रांतिक सरकारें ह्यांनीं ह्या विषयाकडे लक्ष पुरवून आपल्या हिताची जोपासना वेळींच केली पाहिजे. साखरेच्या राष्ट्रीय धंद्याच्या हिताशी दक्षिणेकडील ऊंस पिकवणारे शेतकरी व साखरेचे कारखानदार ह्यांचें हित निगडित झालेलें आहे, ह्यांत शंका नाहीं. तथापि प्रत्येक प्रांत व संस्थान ह्यांच्या आर्थिक परिस्थितीची जबाबदारी तेथील राज्यकर्त्यांवर व जनतेवर असल्यानें मध्यवर्ती औद्योगिक धोरण स्वतःस बाधक होऊं न देण्याची काळजी त्यांनीं घेतली पाहिजे. अंतर्गत स्पर्धा वाढत चालली आहे तीमध्यें आपला टिकाव ह्यापुढें कसा लागेल ह्याचा विचार कारखानदारांनीं केला पाहिजे.

मध्यवर्ती सरकारनें किंवा एखाद्या मध्यवर्ती प्रातिनिधिक मंडळानें स्वदेशी साखरेच्या धंद्याचें नियंत्रण करून अंतर्गत स्पर्धेमुळें त्यावर आपत्ति ओढवणार नाहीं अशी व्यवस्था करावी ह्या आशयाची वर निर्दिष्ट केलेली सूचना कोणत्या मुद्यांवर आधारलेली आहे ह्याची फोड थोडीशी तपशीलवार करणें आवश्यक आहे. स्वदेशी साखरेच्या धंद्यांस संरक्षण १९३२ सालीं देण्यांत आलें. त्याबरोबर ह्या कारखान्यांत फायदा आहे ह्या समजुतीनें भांडवलवाले पुढें सरसावले आणि कारखान्यांचा विस्तार होऊं लागला. परस्पर चढाओढीनें धंद्याचें नुकसान होऊं नये म्हणून कारखानदारांनीं आपला इंडिअन शुगर मिल्स असोसिएशन ह्या नांवाचा संघ स्थापिला आणि साखर विक्रीची सर्वमान्य योजना अमलांत आणण्याचा प्रयत्न चालू केला. १९३६-३७ सालीं हिंदुस्थानांत जनतेस लागणारी सर्व साखर देशामध्येंच तयार करण्याचें सामर्थ्य स्वदेशी कारखान्यांत उत्पन्न झालेलें आढळून आलें. १९३७ सालीं टारिफ बोर्डाची चौकशी झाली, तीमध्यें हिंदी कारखान्यांत जरूरीच्या मानानें फाजील साखर उत्पन्न होणार ही गोष्ट स्पष्ट दिसून आली. त्यानंतर साखरेचे नवीन कारखाने देशांत निघाले आणि जुन्यांचा विस्तार झाला. तथापि, संयुक्त प्रांत व बिहार ह्यांमध्यें दोन वर्षें उंसाचें पीक खराब झाल्याकारणानें तेथील साखरेचें उत्पादन कमी झालें आणि मंदीच्या भावाची व नुकसानीची कारखान्यांची आपत्ती टळली. १९३९-४० सालीं ऊंस व साखर ह्यांचें उत्पादन फार मोठ्या प्रमाणांत झाल्यानें त्या संकटानें पुन्हां डोकें वर उचललें. १९३८-३९ मध्यें केलेल्या एका अंदाजाप्रमाणें हिंदी कारखान्यांचें ऊंस गाळण्याचें सामर्थ्य रोजीना १ लक्ष टन होतें. साखरेचा सरासरीचा उतारा ९½ टक्के व कारखान्यांचे कामाचे दिवस वर्षांतून १३० धरले तर हिंदुस्थानची एकूण उत्पादन शक्ति १३ लक्ष ४२ हजार टन इतकी होते. ह्या अजमासानंतर नवीन साखरेचे कारखाने निघाले आहेत व जुन्यांत विस्तार झाला आहे. त्यामुळें हें उत्पादन सामर्थ्य आतां १४ लक्ष टन आहे असें मानण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थानांत साखरेस एकूण मागणी किती आहे त्याचा नक्की आकडा सांगतां आला नाहीं. तरी १२ लक्ष टनांपेक्षा अधिक साखर येथें खपूं शकत नाहीं असें मानण्यास जागा आहे. गुळापासून व खांडसारी पद्धतीनें बनवलेल्या साखरेचा ह्या १२ लक्षांमध्यें अंतर्भाव होतो, हें विसरतां कामा नये. म्हणजे दर वर्षीं दोन-तीन लक्ष टनांची शिल्लक राहील अशी पुरवठा मागणीची परिस्थिति आहे.

स्वदेशी साखरेचें मामुली वार्षिक उत्पादन १४ लक्ष टन आणि वर्षाचा मामुली खप १२ लक्ष टन अशी स्थिति असतांहि उत्पादन वाढत गेलें आहे ह्याचें कारण वर नमूद करण्यांत आलेंच आहे. खप कायम राहून उत्पादन दोन वर्षें घटलें, ह्या कारणानें साखरेला तेजी होती आणि धंद्यांतल्या फायद्याच्या अपेक्षेनें त्यांत अधिक भांडवल घातलें गेलें. संयुक्त प्रांत आणि बहार ह्यांमधील प्रांतिक सरकारांनीं साखर कारखान्यांवर नियंत्रण घातलें, पण इतरत्र अशा नियंत्रणाच्या अभावीं धंद्याचा विस्तार झाला. ह्या योगानें स्वदेशी कारखानदारांत परस्पर स्पर्धा उत्पन्न होऊन साखरेचे भाव उतरणें आणि धंद्यांतला नफा घटणें अपरिहार्य झालें. कांहीं काळपर्यंत कित्येक प्रांतांतल्या नवीन कारखान्यांस फायदा झाल्यासारखें वाटलें तरी साखरेच्या धंद्याकडे सबंद राष्ट्राच्या दृष्टीनें पाहिलें तर उत्पादनाची वाढ व घटींचे भाव ह्या गोष्टी हानिकारकच आहेत. ह्यासाठीं अखिल भारतीय स्वरूपाचें ह्या धंद्याचें नियंत्रण अगत्याचें झालें आहे. संयुक्त प्रांत व बिहार येथील कारखानदारां-

च्या वतीनें ही सूचना करण्यांत आली आहे. ह्या प्रांतांत चालू व पुढच्या हंगामांतहि १९३९-४० सालाच्या निम्म्या इतकेंच साखरेचें उत्पादन व्हावें असा नियम प्रांतिक सरकारांनीं केला आहे. ह्याचा परिणाम इतर प्रांतांत साखरेचे कारखाने काढण्यास उत्तेजन मिळण्यांत होईल असें तक्रार करणाऱ्या लोकांचें म्हणणें आहे. ते हें विसरतात कीं वरील सरकारांनीं साखरेचे भाव पडूं नयेत, स्थिर रहावे, अशी व्यवस्था केली असून ती साखरेच्या धंद्यास फायदेशीर आहे. दुसरें असें आहे कीं हिंदुस्थानासारख्या मोठ्या देशांत एक दोन प्रांतांतच एखादा धंदा मर्यादित होऊन इतर प्रांतांस त्यांवर अवलंबून रहावें लागणें अन्यायाचें व अनिष्ट आहे. अनुकूल परिस्थितींत कोणताहि धंदा स्थापण्याची संधि सर्वांस मिळणें योग्य आहे. तिच्या विरुद्ध ओरड करणें योग्य नाहीं.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

( वार्षिक सभा, २३-२-४१ सायंकाळीं ५ वाजतां )

वरील बँकेस, ३१ डिसेंबर, १९४० अखेर संपलेल्या वर्षी मागील सालांतील शिल्लक ३८० रुपये धरून २०,६९२ रु. ५ आ. ८ पै नफा झाला. त्याची वाटणी डायरेक्टरांनीं खालील-प्रमाणें सुचविली आहे:—

| | | | |
|---|---|---|---|
| रिझर्व्ह फंड ( सदर फंड आतां रु. १५,००/—होईल ) | रु. ४,१०० | ० | ० |
| कॉन्टिन्जन्सी फंड ( सदर फंड आतां रु. २४,०००/—होईल ) | रु. ७,००० | ० | ० |
| संशयित आणि बुडीत कर्जांकरितां रिझर्व्ह (सदर फंड आतां रु. २०००/—होईल) | रु. १,००० | ० | ० |
| शेअरबद्दल भरलेल्या रकमेवर ता. ३१ डिसेंबर १९४० रोजीं पूर्ण होणाऱ्या वर्षासाठीं द. सा. द. शे. ४ टक्केप्रमाणें प्राप्तीवरील कर-माफ डिव्हिडंड देणें | रु. ६,५१८ | ० | ० |
| नोकर वर्गास बोनससाठीं | रु. १,४०० | ० | ० |
| पुढील सालच्या हिशेबांत ओढण्यास | रु. ६७४ | ५ | ८ |
| | रु. २०,६९२ | ६ | ८ |

बँकेनें १९३८ सालीं मुंबई येथें एक शाखा उघडली. पुणें येथें डेकन जिमखान्यावर ९-मे, १९४० रोजीं बँकेनें एक स्थानिक शाखा सुरू केली. ह्या दोन्ही शाखांची प्रगति व्यवस्थित चालू आहे.

शनिवार ता. ८ फेब्रुवारी, १९३६ रोजीं बँकेची स्थापना सर सोराबजी पोचखानवाला ह्यांचे हस्तें झाली. पहिल्या वर्षअखेर बँकेचें १लक्ष ४३ हजारांचें वसूल भांडवल जमलें व तिचेकडे ७ लाखांवर ठेवी आल्या. पहिल्याच वर्षी बँकेस ६३५ रुपये नफा झाला, त्याचा विनियोग रिझर्व्ह आणि प्राथमिक खर्च ह्यांकडे करण्यांत आला. दुसऱ्या वर्षअखेर भरणा झालेलें भांडवल १ लक्ष, १२½ हजार रुपये झालें, ठेवींचा आकडा १२ लाखांवर गेला व निव्वळ नफा १३¾ हजार रुपये उरला. भागीदारांस करमाफ ३½% डिव्हिडंड मिळालें व त्यानंतर तें दरसाल मिळत गेलें. तिसऱ्या वर्षअखेर बँकेचें वसूल भांडवल १½ लक्ष रुपये झालें व ठेवींचा आकडा १७ लाखांवर गेला. ३१ डिसेंबर, १९३८ अखेर, तिसऱ्या वर्षी, तिला१७½ हजार रुपये नफा झाला. बँकेच्या चवथ्या वर्षअखेर वसूल भांडवलाची रकम १½ लाखांवर गेली व आतां १९४० अखेर तें भांडवल १ कोटि, ८१ हजार रुपये झालें आहे. ठेवींचा आकडाहि २७½ लाखांवर गेला आहे. दुसऱ्या वर्षापासून बँकेनें ३½% करमाफ डिव्हिडंड दिलें व आतां १९४० सालचें ४% करमाफ डिव्हिडंड देण्यांत येणार आहे. बँकेच्या ताळेबंदांत खर्चातून तयार केलेला जिंदगीचा आकडा कोणताहि नाहीं. रिझर्व्ह फंड, कॉन्टिन्जन्सी फंड व संशयित आणि बुडीत खर्चासाठी फंड ह्यांची रकम मिळून १९४० अखेरचा ताळेबंद मंजूर झाला, म्हणजे ४१ हजार रुपयांवर जाईल.

### १९४० च्या ताळेबंदांतील प्रमुख आकडे

**भांडवल व देणें**

| | रुपये |
|---|---|
| वसूल भांडवल | १,८१,२२५ |
| रिझर्व्ह फंड | ११,००० |
| कॉन्टिन्जन्सी फंड | १७,००० |
| संशयित व बुडीत कर्ज फंड | १,००० |
| ठेवी | २७,५२,३७५ |
| १९४० सालचा निव्वळ नफा | २०,३१२ |
| **जिंदगी व देणें** | |
| कर्जे, कॅश क्रेडिट, ओव्हरड्राफ्ट व इतर कर्जे | १३,०५,५५८ |
| इन्व्हेस्टमेंट्स ( सरकारी रोखे ) | ६,८१,६२९ |
| ,, ( डिबेंचर्स, शेअर्स इ. ) | ४,५२,५५६ |
| बँकांत व रोख शिल्लक | ५,०२,५४७ |

### विमापॉलिसीचे तारणावर कर्ज कसें द्यावें ?

आयुर्विमा पॉलिसीचे तारणावर कर्ज देण्यापूर्वी बँकरनें, पॉलिसी ज्या विमा कंपनीची असेल, तिच्या परिस्थितीबद्दल व दर्जाबद्दल खात्री करून घ्यावी. पॉलिसी चांगल्या कंपनीची नसल्यास ती स्वीकारूं नये. हप्त्याची शेवटची पावती त्यानें पहाण्यासाठी मागून घ्यावी. विमेदाराचें वय कंपनीनें मान्य केलें आहे किंवा नाहीं हें पाहून तें केलेलें नसल्यास करवून घ्यावें. पॉलिसीची सोडकिंमत किती आहे ह्याची चौकशी करावी व ती पॉलिसी कोठें लावून दिलेली नसल्याविषयीं खात्री करून घ्यावी. विमेदाराचे मृत्यूचीच ती सरळ पॉलिसी आहेना, हें बँकरनें नीट पहावें. सोडकिंमतीपेक्षा कमी रकम बँकरनें देऊं करावी व बँकेचे नांवानें पॉलिसी बेचन करून घ्यावी. बेचनाची नोंद विमा कंपनींत करवून घेतली पाहिजे. कर्जदाराकडून बँकरनें प्रॉमिसरी नोटहि घ्यावी व "ठराविक वेळीं मी हप्ते भरीन व ते तसे न भरल्यास बँकरला ते भरण्यास व त्यांची रकम माझे नांवें मांडण्यास अधिकार आहे," अशा अर्थाचें पत्र कर्जदाराकडून लिहून घ्यावें. विमा पॉलिसीचे तारणासारख्या सुरक्षित तारणावर कर्ज देते वेळीं इतक्या प्रकारचे कागदपत्र करण्याची आवश्यकता नाहीं असें कर्जदार नेहमींच म्हणेल, परंतु बँकरनें आपल्या पैशाच्या सुरक्षिततेसाठी शक्य तों प्रयत्न करणें, हें त्याचे दृष्टीनें योग्यच आहे.

## स्फुट विचार

### हिटलरचे नवे डावपेंच आणि त्यांचा प्रतिकार

मुसोलिनीनें संधिसाधूपणानें फ्रान्सच्या अडचणीचा फायदा घेतला आणि जर्मनीच्या बाजूनें युद्धांत उडी घातली. हिटलरच्या विजयाचें फळ आपल्या तोंडांत अनायासें पडेल ही त्याची कल्पना खोटी ठरली आहे इतकेंच नव्हे तर, त्यास आफ्रिकेंतील आपल्या मुलखांतून पलायन करावें लागलें आहे. भूमध्य समुद्रांत इंग्लंडला पायबंद घालण्यासाठीं इटलीचा उपयोग करण्याचा हिटलरचा बेत होता तो सपशेल फसला आहे. मुसोलिनी व हिटलर ह्यांनीं इंग्लंडच्या विरुद्ध दोस्ती केली असली तरी ते एकमेकांविरुद्ध डावपेंच करीत आहेत आणि परस्परांचे हेतु ओळखून आहेत. इटलीस रणांगणांत स्वतःच्या मनगटाच्या जोरावर कांहींच करतां आलेलें नाहीं. ग्रीस विरुद्ध मुसोलिनीनें निष्कारण युद्ध पुकारलें, पण त्यांतहि त्यास माघार खावी लागली आहे. ह्या असहाय व फजितीच्या स्थितींत इटलीस जर्मनीची मदत मागणें अपरिहार्य झालें असून आणि आपल्या दोस्ताच्या सहाय्यास धांवणें हिटलरलाहि आवश्यक आहे. ह्या मदतीच्या योगानें हिटलरची इटलीवरील पकड घट्ट होणार असून ब्रिटिशांस भूमध्यसमुद्रांत त्रास देण्याचें साधन त्याच्या हातीं येणार आहे. अमेरिकेचें सहाय्य उघडपणानें व भरपूर रीतीनें इंग्लंडला मिळणार हें आतां निश्चित झाल्याकारणानें युद्धांतला मुळचा डाव टाकण्याची त्याची तयारी चालली आहे. इंग्लंडवर हल्ला चढवण्याच्या प्रसंगीं फ्रान्स, स्पेन व बाल्कन्स मधलीं राष्ट्रें आणि त्याचप्रमाणें जपान ह्यांस एकाच वेळीं उठवण्याचा हिटलरचा बेत असावा असा तर्क आहे. रुमानिया जर्मनीनें पचवलाच आहे आणि आतां बल्गेरियामध्यें घुसण्याची त्याची तयारी चालली आहे. इकडे व्हिशी येथील मंत्र्यांस फ्रेंच बंदरें व आरमार आपल्या हातीं देण्यास भाग पाडण्याच्या कारवाया तो करीत आहे. आणि स्पेनलाहि गुंतवण्याची त्याची खटपट आहे. फ्रँको व मुसोलिनी ह्यांची मुलाखत ह्याच हेतूनें घडवून आणली गेली आहे फ्रान्स आफ्रिकेंतील फ्रेंच सत्ता व स्पेन ह्यांच्या संगनमताचें भूमध्य समुद्रांतलें राजकारण हिटलरला लढावयाचें आहे असा रंग दिसतो. मि. चर्चिल ह्यांनीं त्याचे हे डावपेंच आपण जाणून आहों हें स्पष्ट दर्शवून इंग्लंडला कोणत्या प्रकारची तयारी केली पाहिजे ह्याची कल्पना ब्रिटिश जनतेस नुकतीच दिली आहे. जलनौकांच्या सहाय्यानें इंग्लंडचीं व्यापारी जहाजें बुडवून ब्रिटिशांस घेरून टाकण्याची हिटलरनें धमकी दिली आहे. अमेरिकेची मदत वाढत्या प्रमाणांत येऊं लागेल त्या मानानें हल्ल्याच्या भीतीची तीव्रता कमी होणार आहे. हल्ल्याची तरवार ब्रिटनच्या डोक्यावर सारखी लटकत ठेवण्याचाहि हिटलरचा बेत असूं शकेल. पण ही परिस्थिति फार वेळ टिकूं शकणार नाहीं. ब्रिटिश लढाऊ विमानें केवळ संरक्षक कार्य करून स्वस्थ बसलेलीं नाहींत. त्यांचें चढाईचें धोरण अधिकाधिक प्रभावी होत आहे व त्यांच्या हल्ल्यांचा प्रसाद विस्तृत प्रमाणांत जर्मनीस मिळत आहे. इटलीच्या पराभवामुळें हिटलरच्या लढाऊ योजनांत बदल करावा लागला असला पाहिजे, आणि त्याच कारणानें इंग्लंडवरील त्याचा हल्ला लांबणीवर पडला आहे. फ्रान्स, स्पेन, बाल्कन राष्ट्रें आणि जपान ह्यांची एकत्र मोट बांधण्याचा प्रयत्न करण्याचा प्रसंग त्याचेवर आला आहे. ह्याच्या मुळाशीं ब्रिटिशांचा आफ्रिकेंतील पराक्रम व इटलीची तेथें झालेली फजिती हींच कारणें आहेत. स्वातंत्र्य व लोकसत्ता ह्यांचे संरक्षणार्थ लढणारीं राष्ट्रें एका बाजूस आणि जुलमी व एकतंत्री राज्यकर्ते दुसऱ्या बाजूस असा लढा आतां स्पष्टपणें चालू झाला आहे आणि त्यांत स्वातंत्र्येच्छू लोकांस जय मिळणार ह्यांत शंका नाहीं. त्यांनीं निष्ठेनें व निश्चयानें मात्र लढलें पाहिजे. ह्याची जाणीव अमेरिकेस चांगली आहे.

---

### जपान काय करणार ?

जर्मनी, इटली व जपान ह्यांच्या त्रिकुटानें परस्परांस सहाय्य देऊन स्वतांचें हित साधण्याचा बेत केला आहे. जपानच्या मनांत चीनमध्यें आपली सत्ता स्थापून स्वतःच्या साम्राज्याचा विस्तार करावयाचा आहे. चीनमधील जपानी युद्ध अमेरिकेस पसंत नाहीं आणि पॅसिफिक महासागरांत जपानची सत्ता वाढणें अमेरिकन संघाच्या स्वातंत्र्यास बाधक आहे अशी त्या राष्ट्राची समजूत आहे. अमेरिकेकडून इंग्लंडला होणाऱ्या मदतींत व्यत्यय यावा आणि ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व हिंदुस्थान ह्यांचे बाजूस इंग्लंडचें सामर्थ्य दुभंगावें ह्या हेतूनें हिटलरनें जपानच्या महत्वाकांक्षेस उत्तेजन दिलें आहे. जपानलाहि पॅसिफिक महासागरांत हातपाय पसरण्याची संधी हवीच आहे. ह्या रीतीनें जर्मनी व जपान आपलें स्वार्थी धोरण प्रस्तुत युद्धांत संगनमतानें चालवीत आहेत. ह्याची अमेरिकेस पूर्ण जाणीव आहे आणि प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांनीं ती नुकतीच स्पष्टहि केली आहे. जपानशीं अमेरिकेचें सख्य रहावें अशी त्यांची इच्छा आहे, पण विशिष्ट मर्यादेच्या बाहेर जपान आपलें घोडें दामटूं लागल्यास त्याचा समाचार घेणें अमेरिकेस भाग पडणार आहे. अमेरिकन नागरिकांनीं जपान सोडून स्वदेशीं परत यावें असा सल्ला देण्यांत येत आहे, त्याचा उद्देश स्पष्ट आहे. चीनच्या स्वातंत्र्याविषयींची इंग्लंड व अमेरिका ह्या राष्ट्रांची सहानुभूति प्रसिद्ध आहे आणि चीनला स्वस्वातंत्र्यरक्षणार्थ त्यांच्याशीं सख्य व सहकार्य राखणें क्रमप्राप्तच आहे. ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड हे ब्रिटिश साम्राज्याचे घटक जपान देशाच्या जवळ आहेत आणि तेथील मंत्री प्रसंग आल्यास स्वतःचें संरक्षण करून जपानला तोंड देण्यास समर्थ असल्याचें त्यांनीं बोलून दाखविलें आहे. हिटलरचा बाल्कन्समध्यें आणि पॅसिफिक महासागरांत युद्धाचें जाळें पसरण्याचा डाव आहे. त्या बाबतींत त्याचें व जपानचें रशियाशीं कांहीं संगनमत झालें आहे कीं काय हें समजण्यास मार्ग नाहीं. पूर्व एशियांत युद्धाच्या ज्वाळा पसरण्यापूर्वी जपाननें दूरवर विचार केला पाहिजे. युरोप व आफ्रिका या खंडांत चाललेल्या युद्धाच्या गंगेंत हात धुवून घेण्याचा जपानचा प्रयत्न त्याच्या अंगलट आल्यावांचून राहणार नाहीं हें त्यानें पक्कें ध्यानांत ठेवावें. अमेरिका आणि इंग्लंड ह्यांच्या संयुक्त बळास त्यास तोंड द्यावें लागणार असून हिटलरच्या नादानें त्यानें अविचारास बळी पडतां कामा नये. पॅसिफिक महासागरांत आपण दंगल केल्यास अमेरिकेचें इंग्लंडला होणारें सहाय्य मर्यादित होईल आणि ह्या रीतीनें हिटलरशीं केलेल्या कराराच्या जबाबदारीमधून आपण मोकळे होऊं अशी जपानची समजूत असेल तर ती खोटी आहे. स्वतःची महत्त्वाकांक्षा आवरून धरण्यांतच जपानचें हित आहे. इंग्लंड व अमेरिका ह्यांच्याशीं वागण्याच्या योग्य मर्यादेचें अतिक्रमण करणें हा आत्मनाशाचा मार्ग आहे हें जपाननें पक्कें लक्षांत ठेवावें. आशिया खंडांतली जपानविषयींची सहानुभूतीची भावना केव्हांच नष्ट झालेली आहे. ह्या स्थितींत त्या राष्ट्रानें वेळींच सावध व्हावें हें उचित आहे.

## लिमिटेड कंपन्यांच्या नांवाची पाटी

(ले.:—श्री. पी. सी. वेंद्रे, बी. ए., एलएल. बी. वकील, पुणें)

अलीकडे बऱ्याच कंपन्या स्थापन होत आहेत व कंपनीचे व्यवस्थेसंबंधीं नवीन कायदे होत आहेत. कंपनीचे कायद्यांत वारंवार झालेल्या सुधारणा माहीत नसल्यामुळें कंपनी चालविणाऱ्या लोकांस, तसेंच सर्वसाधारण जनतेसहि बराच त्रास होतो. अशा स्थितींत मुंबई हायकोर्टानें लिमिटेड कंपनीनें आपले नांवाची पाटी लावणेसंबंधीं दिलेला निर्णय पुष्कळच उपयुक्त व बोधप्रद होईल.

डॉ. एच. एल. बाटलीवाला सन्स आणि कंपनी, लिमिटेड ह्या नांवाची प्रायव्हेट लिमिटेड कंपनी नोंदण्यांत आली व मि. कैकोबाद व त्यांचे वडील मि. कावाशा हे कंपनीचे डायरेक्टर झाले. कंपनीचे रजिस्टर्ड ऑफिस कंपनीच्या मालकीच्या "सकलात व्हिला" या नांवाचे बंगल्यांत होतें. कंपनीनें आपले नांवाची जी पाटी लाविली होती ती रस्त्यावरून दिसण्यासारखी नव्हती. बंगल्याचे हद्दीमधून इमारतीचे हद्दींत आल्याशिवाय सदरची पाटी वाचतां येणें शक्य नव्हतें. त्याबद्दल कंपनी ॲक्टाचे ७३ (अ) कलमाप्रमाणें पाटी लाविली नाहीं म्हणून कंपनी व तिचे डायरेक्टर यांजवर खटला होऊन मॅजिस्ट्रेटनें त्यांजवर गुन्हा शाबीत करून दंडाची शिक्षा केली. रस्त्यावरून जाणारे लोकांस कंपनीचें ऑफिस कोठें आहे हें कळण्याकरितां नांवाची पाटी रस्त्यावरून दिसली पाहिजे; त्याशिवाय ऑफिसची नक्की जागा लोकांस कळणार नाहीं म्हणून नांवाची पाटी कांपाउंडचे बाहेर बंगल्याचे फाटकावर लावणें जरूर आहे असा त्यांनीं निर्णय दिला.

या निकालावर मुंबई हायकोर्टाकडे रिव्हिजन अर्ज होऊन हायकोर्टानें खालील कोर्टाचा निकाल फिरवून आरोपींस सोडून दिले. सदरहु फिर्यादींत कलम ७३ (अ) याचा अर्थ लावणें हाच महत्त्वाचा मुद्दा होता. हायकोर्टाचे मताप्रमाणें नांवाची पाटी कंपनीचे ऑफिसचे खोलीबाहेर लावली म्हणजे कायद्याप्रमाणें पुरे आहे. त्याकरितां फाटकावर पाटी लावणेचें कारण नाहीं. ऑफिसचे बाहेर अगर जेथें कंपनीचें काम चालतें त्या जागेचे बाहेर (outside the office or place where the business is carried on) म्हणजे कांपाउंडचे हद्दीपलीकडे असा अर्थ होत नाहीं. ऑफिसबाहेर नांवाची पाटी लावण्यांत कंपनीचें ऑफिस कोठें आहे हें रस्त्यावरून जाणारे येणारे लोकांस कळावें अगर कंपनीचे ऑफिसची नक्की जागा लोकांनां माहीत व्हावी असा हेतु नसून कंपनीकडे कामानिमित्त येणारे इसमास सदर कंपनी ही लिमिटेड कंपनी आहे व आपण लिमिटेड कंपनीशीं व्यवहार करीत आहोंत हें कळावें व तशा सावधगिरीनें लोकांस व्यवहार करतां येऊन कंपनीतर्फे व्यवहार करणाऱ्या लोकांची व्यक्तिशः जबाबदारीची मर्यादा त्यांचे नजरेसमोर कंपनीशीं व्यवहार करीत असतांना असावी, हाच हेतु कंपनीचे नांवाची पाटी ऑफिसचे बाहेर लावण्यांत आहे.

या दृष्टीनें विचार करतां बाटलीवाला सन्स अँड को. लिमिटेड यांनीं लावलेली पाटी ही जरूरीस पुरेशी आहे असेंच सर्वांचें मत पडेल.

---


# दि गुड—वुइल ॲशुअरन्स कंपनी लि.

पोस्ट : मिरज मिशन हॉस्पिटल

विमेदारांस

भरपूर सवलती माफक हप्ते

ठिकठिकाणीं एजंट्स नेमणें आहेत.

पत्रव्यवहार करावा

हेड ऑफिस : कुपवाड, जि. सातारा.

मॅनेजिंग डायरेक्टर

# दि बँक ऑफ इंडिया लि.

[स्थापना : १९०६]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,१३,००,००० |

मुख्य कचेरी : ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद (भद्र ऑफिस), अहमदाबाद (स्टेशन शाखा), अंधेरी (मुंबई शेजारी), बांद्रे (मुंबई शेजारी), कलकत्ता (क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, नागपूर (किंग्जवे), नागपूर (इतवारी बझार), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत.

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष). श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के., के. टी.; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई.; मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण.

करंट डिपॉझिट अकाउंटस :

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमीचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

एजंट:—टी. आर. लालवाणी.

## विचारप्रवर्तक सहकारी बातम्या

( ले. वा. चिं. भानु )

**देखरेखीचा प्रश्न:**—सहकारी पतपेढ्यांचे कामकाजावर देखरेख कोणी कशी व करावी या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाची जोराची उठावणी, अनेक कारणानें सुप्रसिद्ध झालेल्या थॅामस कमेटीनें केल्यापासून त्यावर सर्वस्वी समाधानकारक व इष्ट असें उत्तर सांपडलेलें नाहीं. सुपरविजन कमिटी नेमून सरकारनें उत्तर काढण्याचा आटोकाट प्रयत्न केला, व त्या कमिटीच्या बहुमतानें जो निर्णय दिला त्याला अनुसरून योजनाहि जारी केली. पण हुकमी बहुमतानें कांहीं प्रश्न सुटत नसतात त्याचप्रमाणें हा देखरेखीचा प्रश्न संपला नाहीं. तो पुनः डोकें वर काढूं लागला आहे आणि आतां मुंबईच्या को. बँक्स असोसिएशननें एक नवा इलाज मे. रजिस्ट्रार साहेबांच्या सहविचारें योजला आहे. याचवेळीं मुंबईच्या को-आपरेटिव्ह क्वार्टर्लीचे चालकांनीं कांहीं तज्ज्ञ मंडळींचे या प्रश्नाबाबत अभिप्रायहि मागविले आहेत. गुजराथ प्रांतांतील सहकारी चळवळींतले भीष्माचार्य दिवाण बहादूर मळजी शेट यांनीं आपला अभिप्राय त्यांच्या नेहमीच्या सडेतोड भाषेंत दिला असून तो क्वार्टर्लीच्या ताज्या ( डिसेंबर १९४० ) अंकांत प्रसिद्धहि केला आहे. हा सर्वच लेख विचारप्रवर्तक आहे तथापि त्यांतील कांहीं महत्त्वाचा भाग या ठिकाणीं देतों.

" देखरेखीच्या धोरणाबाबत गेल्या दहा-बारा वर्षांत फेरबदल करण्यांत येत आहेत, व त्या फेरबदलांची अंमलबजावणी मात्र कसून होत नसल्यामुळें एकाचें फल दिसूं लागण्यापूर्वींच दुसरा बदल जारी झाल्यानें केवळ प्रयोगांतच कार्यहानि होतें आहे! आतां डि. युनियन बोर्डांचें भवितव्य कांहीं फारसें आशादायक दिसत नाहीं. खेडा जिल्हा बोर्ड रद्द करण्यांत आलेलें आहे. पंचमहाल जिल्हा बोर्डांत फक्त दोन व युनियन्स आहेत. अहमदाबाद जिल्हा बोर्डाला नियोजित दरापेक्षा ( ¼ टका ) जास्त दरानें वर्गणीची खंडणी देतांना जिल्हा बँक टेकीस आली असून डेप्युटी रजिस्ट्रारनीं हा बँकेवरचा बोजा कमी करण्यांत यावा असा अभिप्रायहीं दिलेला आहे. भडोच जिल्हा बोर्डाला सन १९४०–४१ सालांत ऑफिस भाडें, सेक्रेटरीचा पगार, शिपायाचा पगार वगैरे आवश्यक खर्च भागविणेची मोठी पंचाईत पडलेली आहे. सुरत जिल्हा बोर्डाला जरी सरकारी तपासणी यादींत वर्ग लाभला असला तरी रु. २,७७२ चा तोटा ताळेबंदांत दिसतो व पंचमहाल जिल्हा बोर्ड रु. १,२४४ चा तोटा दाखवितें. यावरूनच बँकांची वर्गणी घेऊनही बोर्डाचा योगक्षेम कसा नीट भागत नाहीं हें उघड दिसतें व आतां सरकारनें ( ठराव नं. १८०५६/२८ ता. १५–४–३६ अन्वयें ) ऑडिट फीमधून इतके दिवस गोळा केलेल्या रकमांतून भरपूर देणग्या देणें क्रमप्राप्त झालेलें आहे. आतां १९३६ सालीं सरकारनें दिलेल्या वचनाप्रमाणें देणग्या न दिल्या तर हीं जिल्हा बोर्डें यापुढे टिकाव धरून राहूं शकणार नाहींत."

" कांहीं बँका पूर्वी युनियन्सना खर्चाच्या ½ पर्यंत देणग्या देत होत्या. पण सुपरव्हिजन कमिटीच्या रिपोर्टावरून जारी झालेल्या सरकारी हुकुमानंतर सोसायट्यांकडे गुंतलेल्या भांडवलावर ⅛ टका दरानें वर्गण्या देऊं लागल्या. कांहीं बँका सरकारी देणग्या इतक्याच रकमांची वर्गणी देतात, तर कांहीं रद्द झालेल्या सोसायट्यांकडील कर्जांच्या बाक्या वगळून जेवढें कर्ज येणें असेल त्यावरच ⅛ टका दरानें वर्गणी देतात. सारांश, वर्गणीबाबत निश्चित व सरसहा एक असें धोरण आढळत नाहीं. तेव्हां सर्वांस सारखें धोरण लागू करून सरकारनें येणारा तोटा स्वतःच्या देणगीनें भरून काढल्याशिवाय युनियन्स व बोर्ड कार्यक्षम होणार नाहींत."

" कांहीं जिल्ह्यांत सोसायट्यांकडून वसूल केली जाणारी वर्गणी जिल्हाबोर्डाकडे एकत्रित केली जाते व मग तालुका यूनियन्सचा खर्च बोर्ड भागवितें, तर कांहीं तालुका यूनियन्स जमविलेली वर्गणी स्वतः जवळच ठेवतात! हा जिल्हाबोर्डाच्या पोटनियमांचा उघड उघड भंग आहे. पण त्यावर जरूर तो इलाज वरिष्ठ अधिकारी करीत नाहींत. उलट अशा युनियन्सना सरकारी तपासणींत ' अ ' वर्गही मिळूं शकतो!"

" यूनियन बोर्डावर बँक व इन्स्टिट्यूटचे प्रतिनिधि घेण्याचा पोटनियम आहे. अलीकडे इन्स्टिट्यूट ह्या जिल्ह्यांतील संस्था नामशेष करण्यांत आल्यानें मुंबईच्या इन्स्टिट्यूट मार्फत प्रतिनिधी पाठविणें भाग पडलें. पण या दोघां प्रतिनिधींचा प्रवासभत्ता देण्यामध्येंहि एक वाक्यता नाहीं. कांहीं जिल्ह्यांत तालुका युनियन्स व जिल्हा बोर्ड प्रवासखर्च देतात, तर कांहीं जिल्ह्यांत ज्या संस्थांचेतर्फे हे प्रतिनिधी येतात त्या संस्थांना खात्याच्या हुकमावरून द्यावा लागतो. इन्स्टिट्यूटनें आतां नुकतेंच प्रवास भत्ते कोणाला मिळणार नाहींत असे हुकूम काढले आहेत. म्हणजे प्रतिनिधींवर दुहेरी बोजा येणार. एक आपला उद्योगधंदा सोडून वेळ मोडून युनियनच्या अगर जिल्हाबोर्डाच्या सभेला जायचें. व जाण्या-येण्याचा व जरूर पडल्यास खाण्या-जेवणाचा खर्च स्वतःच सोसायचा! यामुळें अहमदाबाद, सुरत आणि पंचमहाल जिल्ह्यांत इन्स्टिट्यूटचा प्रतिनिधि म्हणून युनियन्सवर कोणीही जात नाहीं!"

" बँका आणि इन्स्टिट्यूट यांचे प्रतिनिधित्व युनियन्स व जिल्हाबोर्डांतून अजीबात कमी करावें व सरकारी सब् ऑडिटर्स यांना यूनियन सुपरवायझर म्हणून नेमावे असा एक विचार प्रकट केला जात आहे. पण जोपर्यंत तालुका युनियन्स व जिल्हा युनियनबोर्ड यांच्या पोटनियमांत सरकारी खातें बदल करीत नाहीं तोपर्यंत हा विचार, विचारक्षेत्रांत घेण्याचें कारण नाहीं. सरकारनें तपासणीचें काम जरी आपल्या हातीं घेतलें तरी देखरेख ही युनियन्सच्याचकडे असली पाहिजेत. देखरेख ही स्वावलंबनाचें तत्त्वावर अधिष्ठित आहे. स्वतःचा कारभार स्वतः चालविणें हेंच तें तत्त्व. सब् ऑडिटराकडून सोसायट्यांवर देखरेख करविणें हें सुपरविजन कमिटीच्या शिफारशीविरुद्ध आहे."

" देखरेखीचें काम बँकांनीं घ्यावें असेंही सुचविणेंत येत आहे. हें काम घेण्यास बँका तावडतोब तयारही होतील, व त्यांत वावगें असें फारसें कांहीं नाहीं. पण कर्जे देणाऱ्या संस्थेची देखरेख स्वतःचें भांडवल सुरक्षित राहण्यापुरती म्हणजे कोती असेल, आणि सुपरव्हिजन कमिटीच्या रिपोर्टांत म्हटल्याप्रमाणें "परिपूर्ण नसणार व उलट एकांगी असणार." म्हणून देखरेख ही एका वेगळ्याच संस्थेकडे असणें बरें."

"सोसायट्यांचे नार्मल क्रेडिट पत्रकाची छाननी करण्याचें काम युनियन्सकडे इतःपर ठेवूं नये अशीहि एक सूचना करण्यांत येत आहे. पण सुपरवायझरांच्या कर्तव्यापैकीं एक तें छाननीचें काम आहे. बँकाच्या इन्स्पेक्टरांना ते नीटसें जमणार नाहीं कारण त्यांना तितकीशीं स्थानिक माहिती नसल्यानें तें अपुरेंच होईल!"

* * *

दिवाणबहादुरांची वरीलपैकीं कांहीं मतें सर्वांना सर्वस्वी तंतोतंत पटतील अशीं जरी नसलीं तरी या देखरेखीच्या व युनियन्सच्या कामकाजाच्या बाबत विचार करण्यास भाग पाडतील अशीं मात्र खात्रीनें आहेत याबद्दल कोणाचेंही दुमत होणार नाहीं.

## हातमागाच्या धंद्याची पहाणी.

यांत्रिक युगास प्रारंभ होण्यापूर्वी हिंदी कापडाची निर्गत परदेशी मोठ्या प्रमाणावर होत असे. डाक्याची मलमल आणि बनारसचे शालू यांची प्रसिद्धी पूर्वीपासूनचीच आहे. परंतु यंत्रांमुळे प्रचंड प्रमाणावर उत्पादन करणें शक्य झाल्यामुळे परदेशांत माल स्वस्त दरानें निघूं लागला. त्यांतच हिंदुस्थानच्या आयात-निर्गतींत खुल्या व्यापारी तत्त्वाचा पुरस्कार केला गेल्यामुळे हिंदी कापड-निर्गत घटून परदेशी माल हिंदी बाजार पेठेंत उतरूं लागला. यंत्रावर तयार झालेल्या कापडाशीं एकाच वेळीं गुणानें व किंमतीनेंहि टक्कर देणें हातमागावर तयार होणाऱ्या कापडास शक्य नव्हते. त्यामुळें ह्या धंद्यावर उपजीविका करणाऱ्या कामगारांची स्थिति कठीण होऊं लागली. पुढें हिंदुस्थानांतच कापडाच्या गिरण्या निघाल्या. त्यामुळें हातमागावर काम करणारांचा प्रश्न विकटच झाला.

ह्याचीं प्रमुख कारणें दोन-तीन आहेत. गिरणींत यंत्रांवर काम करतांना हातमागावर काम करणाराचें कौशल्य फारसें उपयोगी पडत नाहीं असा अनुभव आहे. ह्यामुळें नोकरी करावयास नाखूष असलेले कामगार गिरण्या निघूनहि आपल्याच धंद्याला चिकटून बसण्यास उत्सुक झाले. शिवाय असें कीं हातमागाचा धंदा शेतीचा जोड-धंदा या दृष्टीनें केला जात असल्यामुळें त्या वर्गातील कामगारांना स्वतःचें घर-दार व शेती-वाडी सोडून जाणें अशक्य होतें. आजहि कित्येक कामगार हिंदुस्थानभर पसरलेल्या लहान लहान खेड्यांत हातमागाचा धंदा नेकीनें चालवीत आहेत.

परंतु त्यांची स्थिति अत्यंत विकट आहे. सूत खरेदी करण्यास पुरेसा पैसा नाहीं; मालविक्रीचा प्रश्नहि तितकाच कठीण आहे. बरें स्वतः माल पाठीवर मारून विक्रीकरितां बाहेर पडावें तर उत्पादन अडतें नी गिरणीच्या स्वस्त व दिसावयास सुरेख मालापुढे हातमागाचा माल घेणार कोण हाहि प्रश्नच असतो. शिवाय, ज्यांनीं सुताकरितां पैसे दिले त्यांच्याशीं तयार माल-विक्रीचा करारहि अगोदरच करावा लागतो. त्यामुळें ते स्वातंत्र्यहि नसतें. ह्या सर्व परिस्थितीची जाणीव सरकारास व हिंदी विचारवंत पुढारी व अर्थशास्त्रज्ञ यांना असल्याचें दिसतें. प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनीं बाविसाव्या हिंदी आर्थिक परिषदेंत आपल्या अध्यक्षीय भाषणांत हिंदी हातमागाच्या धंद्याचा कळकळीनें उल्लेख केला आहे. तत्पूर्वी लखनौ येथें भरलेल्या बाराव्या औद्योगिक परिषदेंत या धंद्यासंबंधीं चर्चा होऊन त्याची पहाणी करण्याकरितां समिति नेमण्यांत येण्याबद्दल सूचना करण्यांत आली होती. त्या सूचनेस अनुसरून मद्रास विद्यापीठाचे अर्थशास्त्राचे प्राध्यापक डॉ. पी. जे. टॉमस ह्यांचे अध्यक्षत्वाखालीं समिति आतां नेमण्यांत आली आहे. कलकत्त्याचे राय बहादुर हृषीकेष मुकर्जी हे ह्या समितीचे सभासद असून अलाहाबादचे श्री. बी. पी. आढारकर हे सेक्रेटरी आहेत.

समितीचें काम खालील मुद्यांस धरून व्हावयाचें आहे:—

१. प्रांतिक व संस्थानी सरकारांच्या मदतीनें त्या त्या प्रांतांतील व संस्थानांतील हातमागाच्या धंद्याची पाहणी करून हातमागावर तयार होणाऱ्या कापडाच्या निरनिराळ्या प्रकारांचा आणि त्या धंद्यांतील कामगारांच्या संख्येचा अंदाज करणें.

२. विणकरांना खरेदी करावयास लागणाऱ्या सुताच्या तसेंच त्यांनीं तयार केलेल्या मालाच्या उठावाच्या बाजार पेठा व पद्धती यांवर मत देणें.

३. हातमागावर तयार झालेल्या मालाची गिरण्यांत तयार होणाऱ्या कापडाबरोबर तुलना करून त्या त्या प्रांतांत हातमागावरील कापड व गिरण्यांत तयार होणारें कापड यांमध्यें असलेल्या स्पर्धेचें स्वरूप स्पष्ट करणें.

४. हातमाग चालविणारे कामकरी कोणत्या प्रकारचें सूत वापरतात व त्यापासून कोणत्या प्रकारचा माल तयार करतात याची चौकशी करणें.

५. खालच्या नंबरचें सूत गिरण्यांनीं वापरूं नये अशी योजना केली असतां हातमागाच्या मालाचें उत्पादन टिकण्यास कितपत मदत होईल?

वरील मुद्यांवरून समितीच्या कार्याची दिशा स्पष्ट होते. समितीनें पहाणी करून रिपोर्ट करावयाचा आहे.

---

## लिमिटेड कंपन्यांस ओव्हरड्राफ्ट देण्याची पद्धत

एकाद्या जॉइंट स्टॉक कंपनीचे नांवानें बँकेंत ओव्हरड्राफ्ट खातें उघडण्यापूर्वी बँकेनें कंपनीकडून खालील कागदपत्र मागवून घ्यावे व त्यांची नोंद करावी.

(१) मेमोरँडम व आर्टिकल्स ऑफ असोसिएशन ह्यांची छापील प्रत. ह्या प्रतीनंतर त्यांत दुरुस्ती केलेली असूं नये, ह्यासाठी मागविलेली प्रत अगदीं ताजी असल्याबद्दल कंपनीचा सेक्रेटरी अथवा मॅनेजिंग एजंट ह्यांची सही घ्यावी.

(२) कंपनीच्या नोंदणीचें मूळ सर्टिफिकेट.

(३) कंपनीस व्यवहार करण्यास प्रारंभ करण्यास परवानगी देणारें रजिस्ट्रारचें मूळ सर्टिफिकेट.

(४) कंपनीच्या डायरेक्टरांच्या ज्या सभेंत ओव्हरड्राफ्ट खात्यासंबंधीं ठराव मंजूर झाला, त्या सभेच्या अध्यक्षाचे सहीखालीं ठरावाची नक्कल व जे खातें चालविणार, त्यांच्या नमुन्याच्या सह्या. ह्या सह्या त्यांच्याच असल्याबद्दल दाखला.

बँकरनें ज्या कंपनीस ओव्हरड्राफ्ट हवा असेल, तिच्या मेमोरँडम व आर्टिकल्समधील कलमें प्रथम नीट वाचावीं. कंपनीतर्फे कर्ज काढण्यास डायरेक्टरांस अधिकार असल्याविषयीं बँकरनें खात्री करून घ्यावी. ओव्हरड्राफ्ट मंजूर करावा, अशा अर्थाचा बोर्डाचा ठराव कंपनीकडून त्यानें करून घ्यावा व त्यांत अडव्हान्सची रकम व तिच्या परतफेडीची व्यवस्थाहि नमूद करून घ्यावी. कंपनीचें रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट व व्यवहारास प्रारंभ करण्यास मंजूरी देणारें सर्टिफिकिट हीं मागण्याचें प्रयोजन चटकन लक्षांत येत नाहीं, परंतु हीं सर्टिफिकिटें कंपनीस मिळण्यापूर्वी डायरेक्टरांनीं केलेले व्यवहार त्यांच्या अधिकाराबाहेरच ठरून बँकेनें दिलेले पैसे परत मिळणें कठीण जाण्याचा संभव असतो. त्यासाठी ही दक्षता बाळगणें जरूर असतें.

ओव्हरड्राफ्टसंबंधींच्या ठरावाचा नमुना ओव्हरड्राफ्टच्या अर्जाबरोबरच बँक देते. हा अर्ज पुरा झाल्याविना व ठरावासंबंधींचे कागद बँकेच्या हातीं आल्याविना बँकरनें खातें उघडू नये. ह्या सर्व मामुली गोष्टी झाल्या, म्हणजे महत्त्वाचा प्रश्न ओव्हरड्राफ्टच्या तारणासंबंधींचा येतो. हें तारण सोइस्कर ठरल्यास, त्याचे शेंकडा किती टक्यांइतकें कर्ज मंजूर करावयाचें एवढाच प्रश्न उरतो.

## हिंदुस्थान-ब्रह्मदेश व्यापारी करार

" १९३७ मध्यें, ब्रह्मदेश व हिंदुस्थान विभक्त करण्यांत आले त्या वेळेपासून अस्तित्वांत असलेल्या इन्डो—बर्मा ट्रेड ऑर्डरीची मुद्दत येत्या मार्चअखेर संपत असल्यानें, या व्यवस्थेचे बदली एक नवीन व्यापारी करार या दोन देशांत व्हावा एतदर्थ हिंदुस्थान व ब्रह्मदेश सरकारचे प्रतिनिधि यांमध्यें दिल्ली येथें वाटाघाटी सुरू झालेल्या आहेत.

" हिंदुस्थान व ब्रह्मदेश यांमधील व्यापाराची परिस्थिति थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहे. १९३९–४० सालचे आंकड्यावरून असें दिसून येतें कीं, या देशाची निर्यात ठोकळपणें १४ कोटि रुपयांपर्यंत असून आयात ३३ कोटि रुपयांची आहे. या आकड्यांची तत्पूर्वीच्या दोन वर्षांची सरासरी घेतल्यास ती अनुक्रमें २५½ व १०½ कोटि रुपये आहे. अर्थात् ही परिस्थिति एकतर्फी असून ब्रह्मदेशाचे दृष्टीनें ती जास्त फायदेशीर अशी आहे. ब्रह्मदेशांत गुंतलेल्या हिंदी भांडवलावर मिळणारा नफा व तेथें वसाहत करून असलेल्या लोकांनीं पाठविलेला पैसा हीं येथें जमेस धरलेलीं नाहींत.

" ब्रह्मदेशाचा जवळ जवळ ८० टक्के निर्यात व्यापार या देशाशीं आहे व त्यांत मुख्यत्वेंकरून ( १ ) केरोसिन, पेट्रोल, लुब्रिकेटिंग ऑइल्स, ( २ ) तांदूळ, ( ३ ) टीक व इतर जातीचें लांकूड यांचा समावेश होतो. केरोसिन, पेट्रोल व इतर तेलें इतर देशांतून आपणांस योग्य बाजारभावांत सहज मिळूं शकतील. या तेलांचे बाबतींत ब्रह्मदेशाला आपली बाजारपेठ मिळाली आहे, ह्याचें कारण म्हणजे आयात जकातींबाबत त्या देशास मिळत असलेली सवलत, हें होय. येथून ब्रह्मदेशांत मुख्यत्वेंकरून कापसाचें कापड व सूत, लोखंड व पोलादाचा माल, पाटाचें कापड, पोतीं, वगैरे, कोळसा, कणीक, कच्चा व तयार तंबाखू, मीठ, मासळी व भुइमुगाचें तेल ह्या जिनसा निर्यात होतात. या मालावर त्या देशांत आयात जकात याशी लागत नसून या निर्यातीचे जिनसांत पहिले तीन वस्तूंचेंच पमाण मोठें आहे. ज्याचे योगानें दोन्ही देशांचा फायदा होईल अशाच तऱ्हेचा नवीन करार उभय देशांच्या गरजा ध्यानांत घेऊन घडविण्यांत येईल. " ( महाराष्ट्र चेंबरच्या ता. १२–२–४१ च्या त्रैमासिक साधारण सभेंत चेंबरचे उपाध्यक्ष श्री. द. रा. नाईक ह्यांचें भाषण. )


**DECCAN BOOK STALL**

Booksellers, Publishers & Subscription Agents
**Ferguason College Road, Poona No. 4**


( 1 ) We stock and supply Educational books, General books & Library books.
( 2 ) We supply Government of Bombay and Government of India publications.
( 3 ) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
( 4 ) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

दि
**बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड**

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो
बँकेची शेअर-विक्री चालू आहे

मुख्य कचेरी
लक्ष्मी रोड, पुणें.

मुंबई शाखा — दलाल स्ट्रीट, कोट
पुणें शाखा — डेक्कन जिमखाना



**मधुमेहावरील औषध**

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

**The Co-operators' Book Depot.**

9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.

**The Only Book Depot of its Kind in India.**

*Specialising in*

Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.

Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६ शनवार पेठ, पुणें २.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | ११२—३ |
| ४% १९४३ | १०४—१० |
| ३½% विनमुदत | ९५—० |
| ३½% १९४७–५० | १०२—८ |
| ३% ( १९६३–६५ ) | ९४—२½ |
| २¾% १९४८–५२ | ९७—० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०७—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५१–६३) | ११४—६ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आंकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००–५०) ११% | १४४—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | १०८—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ४३–१२ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १५६०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०५—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% | १३३—८ |
| कराची ( १०० ) ९% | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २१५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १५६७—८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १८१०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | १०४—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) १½% | ६३—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ९७७—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% | ६५०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. | २०८—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४६–१२ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. | २१—२ |
| न्यू इंडिया विमा ( ४५–१५ ) १ रु. | ४१—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ३९५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २१२—८ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. | १४९—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३७५—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै | १८९२—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | १३५—४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४२–७–३ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस | ६३–५–० |


**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा, केंस गळणें व टक्कल

ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

**" अर्थ " ग्रन्थमालेंतील पुस्तकें**

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.

२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.

३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.

* * *

१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.

२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.

अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

**पुण्यांत आल्यावर**

सुशिक्षितांनीं सुरू केलेल्या

**OUR HOME**

या

कमालीच्या स्वच्छ, सात्विक व पुष्टिदायक निवास भोजनालयांत

**उतरण्यास या.**

मध्यवर्ती, हवाशीर मोकळी जागा व सर्व सुखसोयी

याच एका ठिकाणीं

अनुभवास येतील.

अवर होम,

६१९ शनवार पेठ, नातूंचे हौदासमोर, पुणें.

कामगार ब्राम्ही तेल
शिरोमणि तेल
आवळ्याचें तेल
स्थापना १९०९
डोकें शांत रहातें. केंस मजबूत होतात.
गळण्याचे बंद होतात व मऊ रहातात.
धी बॉम्बे कलकत्ता ट्रेडींग कं. (मुंबई नं. ४)



तमाम दंत रोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूना सिटी

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडिमी,** ६७२ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.

**अर्थशास्त्र**
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
**महिंद्रकर ब्रदर्स**
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.